The
INVOICE
Issue 2 – 1st July 2019




## Inside This Issue

- बोधिशाला / Pg. 1
- संपादकीय / Editorial Pg. 2
- A Million lamps … / Pg.3
- अंधारातील दिवे / Pg.3
- राज्यसेवा(MPSC) / Pg.4-5
- Rubaiyat/Pg.5
- Read and Rehearse / Pg.6
- Unmute the Mute/ Pg.6

The objective of this newsletter is to bring social awareness amongst deprived and oppressed class of people for their rights, academic and career opportunities. Authors can send their articles in any of the languages which are spoken and written in India. Kindly choose the following way to send your articles Or opt for free subscription: Email on newsletterinvoice@gmail.com | message on WhatsApp : 9821105116

समाजाच्या शोषित -मागास वर्गामध्ये त्यांच्या हक्काबद्दल जागृती यावी, शैक्षणिक आणि नोकरी-व्यवसाय संदर्भातील संधींचे आकलन व्हावे हा या नियतकालिका मागचा उद्देश आहे.आपल्यालाही आपले विचार मांडायचे असल्यास, आपणही आपले साहित्य पाठवू शकता. लेखकांना त्यांच्या बोलीभाषेत किंवा त्यांना हव्या त्या भाषेत लिहिण्याचे स्वातंत्र्य आहे.तुम्ही तुमचे साहित्य पाठवण्यासाठी किंवा नि:शुल्क सदस्यनोंदणीसाठी पुढील पैकी एक मार्ग निवडा:

ईमेल : newsletterinvoice@gmail.com

व्हाट्सअप मेसेज : 9821105116

मोठ्या गोष्टीचे बेत करण्यापेक्षा छोट्या गोष्टीने आरंभ करणे अधीक श्रेयस्कर ठरते.

-डॉ. बाबासाहेब आंबेडकर

## बोधिशाला

भगवान बुद्ध हे मनोविजयी होते हे सर्वज्ञात आहे. ते नेहमी शांत, सस्मित, आणि प्रसन्न असत. त्यांच्या सहवासात येणारया लोकांनाही या प्रसन्नतेचा लाभ होत असे. पण काही लोक असेही होते की त्यांना गौतमांना मिळणारा सन्मान सहन होत नसे. त्यांचा अगदी जळफळाट होत असे. असाच एक माणूस एकदा गौतमांना रागवावयास भाग पाडायचेच, त्यांचा अपमान करायचाच, फजिती करायचीच असे ठरवून त्यांच्या प्रवचनाच्या ठिकाणी आला.प्रचंड जनसमुदाय जमला होता. तथागत शांतपणे त्या समुदायाला मार्गदर्शन करत होते. तेंव्हा हा माणूस तेथे पोचला आणि सर्वांसमोर त्याने गौतमांना न भूतो न भविष्यति अश्या शिव्या दिल्या. जमलेले लोक अस्वस्थ झाले, संतापलेही. पण तथागत शान्त होते. त्यांच्या चेहरयावरील स्मित जरासुद्धा ढळले नव्हते. तो माणूस बराच वेळ अद्वातद्वा शिव्याशाप देत होता. बरयाच वेळाने तो थकून थांबला व डोळे तारवटून गौतमांकडे पहात राहिला.

तथागतांनी स्मितहास्य केले व शान्त स्वरात ते बोलले,"मी तुला एक प्रश्न विचारू काय?"

"विचारा" तो गुरगुरला.

"जर तुला कोणी एखादी वस्तू भेट दिली आणि ती भेट स्वीकारण्यास तू नकार दिलास तर त्या भेटीवर मालकी कुणाची?"

"मालकी?"

"हां, ती भेटवस्तू कोणाकडे राहील?"

"इतकही कळत नाही? सोपं आहे, ती वस्तू त्या देणारयाकडे राहील" तो माणूस म्हणाला.

"अगदी बरोबर!" तथागत स्मित करीत म्हणाले, "मग जर मी तुझे हे शिव्याशाप स्वीकारण्यास नकार दिला तर ते कोणाकडे रहातील?"

तो माणूस सुन्न झाला आणि तथागतांच्या चरणी लागला.

तात्पर्य: जगात कोण आपल्याला काय बोलेल यावर आपण नियंत्रण ठेवू शकत नाही. पण त्यांच्या स्तुतिशापांचा स्वीकार करणे न करणे हे पुर्णपणे आपल्याच हाती असते. आपण स्वताचा अपमान करून घ्यायचा म्हटला तर तो घोर अपमान होऊ शकतो अन्यथा ते असतात केवळ शब्दांचे बुडबुडे! ऑफिसात, समाजात वावरतांना हे जर लक्षात ठेवले तर खूपच मनस्ताप कमी होऊ शकतो.

## संपादकीय |

# ‘किसी के बाप का हिन्दोस्तान थोड़ी है’

**मागच्या** काही दिवसात ज्या मन खिन्न करणाऱ्या आणि मेंदू सुन्न करणाऱ्या घटना घडल्यात,आर्यन खडसे या लहान जीवाला 'शिक्षा' देताना जातीवाद्यांनी त्याला गरम फरशीवर बसवणे आणि त्यात त्याला गंभीर दुखापत होणे आणि त्यानंतरही त्या ढोरे नावाच्या गावगुंडाचे बिनधास्त फिरणे, तबरेज अन्सारी नावाच्या युवकाची जमावाकडून झालेली नृशंस हत्या - जय श्रीराम च्या घोषणा वदवून घेत एका निष्पापाला मरण देणाऱ्यांना भारतीय कायद्याची भीती न वाटणे यात आपण एक माणूस म्हणून आणि भारतीय नागरिक म्हणून आपण किती अधोमार्गी होत चाललोय याची जाणीव होत चालली आहे.

या देशाला जो सामाजिक विषमतेचा इतिहास आहे, रानटी पद्धतीच्या सूडचक्रानी विरोधकांना संपवण्याची जी खुमखुमी सामाजिक शिरोस्थानी बसलेल्यांना आहे त्यांनी भारतीय समाजमन कलुषित केले आहे. राष्ट्रवादाची भव्य प्रतीके उभी करता करता सामाजिक सौख्याची सदैव असणारी गरज अधोरेखित करण्यात आपण कमी पडत आहोत. मागच्या दोन दशकात राष्ट्रीय प्रतीकांच्या यादीत नव्या धार्मिक प्रतीकांची भर घालण्यात धर्मवादी शक्ती यशस्वी झाल्यात.समाजवादी,साम्यवादी,समतावादी चळवळींच्यात पद्धतशीर 'मोल्स' घुसवून या चळवळी संपवल्यात ,आणि ज्या चळवळी ते संपवू शकले नाहीत त्याबद्दल सामान्य लोकांच्यात , नव्या पिढीच्यात त्यांबद्दल विभ्रम पसरवण्याचे काम उजव्या शक्तींना शक्य झालेय.

नव्वदीच्या दशकात ज्या 'मंदिरनिर्माणाची' निकड निर्माण करण्यात सत्ताधारी आणि विरोधी पक्षात बसलेल्या अराजकतावादी शक्तींना यश आले त्याने भारतीय राजकारण आणि समाजकारणावर दूरगामी विपरीत परिणाम झाला.आज बहुतांश लोकांनी मोठ्या विश्वासाने ज्यांना सत्तासोपानावर चढवलेय त्या लोकांनी ह्या अराजकतावादी विचारधारेला जवळ केलंय.गोरक्षेच्या नावाखाली सामान्य माणसांची हत्या करणे , जय श्रीराम किंवा इतर कोणत्याही घोषणेसाठी एका जित्याजागत्या माणसाला मारहाण करून ठार करणे, विरोधी विचार बाळगले म्हणून विचारवंतांची ठरवून हत्या करणे, या सगळ्या विरोधी मते मांडणाऱ्या ,निषेध व्यक्त करणाऱ्यांना धमक्या देणे, देश सोडून जाण्याचे अनाहूत सल्ले देणे,आब्रू घेऊ,जीव घेऊ, दाभोळकर करू असे ट्रोल करणे,शतकानुशतके वेडीवाकडी का होईना जी काही उरलीसुरली सामाजिक वीण इथल्या सामान्यांनी जपली होती त्याला सुरुंग लावायची कामे या अराजकतावादी टोळीच्या नव्या प्रतिनिधींनी चालू केलीत.

इथली व्यवस्था वर्षानुवर्षे दबलेल्याना अजून दाबायचेच काम करते, कारण व्यवस्थेचे वाहक हे सगळे गुलामगिरीचे समर्थक आहेत.समाजमन जसे तशी व्यवस्था वागत असते.मी माझ्या पिढीचा एक सजग प्रतिनिधी म्हणून सांगू शकतो कि आधीही या घटना होतच होत्या पण त्यांना समाजाच्या मोठ्या भागाने वैचारिक पाठिंबा नव्हता दिला. आज या घटनांना पाठिंबा देणारे लोक मोर्चे काढतात, हत्यारे नाचवतात, राजकीय पाठिंबे देतात. पीडितांचे चारित्र्यहनन करतात,त्यांच्यावर झालेल्या अत्याचाराला सामाजिक गरज भासवतात.ज्या गुन्ह्यांना मान्यता नव्हती त्यांना राजधर्म बनवण्याचा जो हिणकस प्रकार या दशकात सुरु झालाय व त्याबद्दल इथल्या सजग माणसांनी भूमिकाच घेऊ नये यामुळे हि व्यवस्था अजून सोकावत चालली आहे.

इथल्या लोकांनि स्वतःला एक प्रश्न विचारायची गरज निर्माण झाली आहे कि आपण स्वतः किंवा आपले जवळचे कोणी अश्या दुर्दैवी घटनेत बळी पडले तर आपल्याला चालेल काय?आपण एक लक्षात घेतले पाहिजे कि अपवाद जेव्हा रिवाज होऊ पाहतो त्यावेळी त्याला वेळीच समूळ संपवायला पाहिजे. आपली घरे , दारे ,शेजार ,समाज सुरक्षित ठेवायचा असेल तर अश्या घटना घडू देऊ नयेत.गुन्हेगारांना नागरी समाजाची सूत्रे आपण देताना हे गुन्हेगार आपल्या घरात देखील घुसणार आहेत हे वेळीच ओळखायला हवं. माणसे मारायची सवय झालेले हि जनावरे आहेत,यांना सत्ता देताना जर यांनी उद्या तुमचेच लचके तोडले तर आज जो उन्माद किंवा दुर्लक्ष दुसरा कोणी मेल्यावर करत असाल तर त्यावेळी दुसरे कोणीतरी तुमच्यासाठी तोच उन्माद दाखवत असतील किंवा मला काय त्याचे म्हणून आजच्यासारखेच दुर्लक्ष करत असतील.

संपूर्ण भारतात आता गुंडशाही आणि झुंडशाही संपवण्याची वेळ आली आहे. जनतेने सत्ताधाऱ्यांच्या अधीन न होता त्यांना धाकात ठेवणे गरजेचे आहे. नव्या दमाच्या मतदारांना हे आव्हान आहे कि तुम्ही तलवारीच्या टोकावर क्रांतीची स्वप्ने पाहण्याची हि वेळ नाही आणि गरज सुद्धा नाही , जर खरंच भारताच्या विकासाचे स्वप्न पाहत असाल तर पहिल्यांदा आपल्या समाजातल्या अनिष्ट गोष्टींच्या विरोधात उभे ठाका.सामाजिक सलोखा आणि भारतीयत्व जागृत ठेवायचे असेल तर कुठलाही कट्टरतावाद नाकारायलाच हवा आणि धार्मिक झापड बाजूला सारायलाच हवी. राहत इंदौरी साहेबांची हि कविता प्रत्येकाने आपल्या मनमानावर कोरून घ्यायला हवी अशी आहे.

अगर ख़िलाफ़ हैं होने दो जान थोड़ी है  
ये सब धुआँ है कोई आसमान थोड़ी है  
लगेगी आग तो आएँगे घर कई ज़द में  
यहाँ पे सिर्फ़ हमारा मकान थोड़ी है  
मैं जानता हूँ के दुश्मन भी कम नहीं लेकिन  
हमारी तरहा हथेली पे जान थोड़ी है  
हमारे मुँह से जो निकले वही सदाक़त है  
हमारे मुँह में तुम्हारी ज़ुबान थोड़ी है  
जो आज साहिबे मसनद हैं कल नहीं होंगे  
किराएदार हैं ज़ाती मकान थोड़ी है  
सभी का ख़ून है शामिल यहाँ की मिट्टी में  
किसी के बाप का हिन्दोस्तान थोड़ी है !

-भावेश लोखंडे

*या न्यूज़लेटर मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेली साहित्य,मते हि त्यांच्या निर्माणकर्त्यांची आहेत.त्यांच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.







## A MILLION LAMPS TO BE ENLIGHTENED

TINY GANG OF DHARAVI

Meet my gang, naughtiest kids from my neighborhood, Dharavi. Aditya, Pratham, Raj, Yash, Pooja, Dhanraj, Akshada, Renuka, Pratik, and newly joined Sahil. They are 6 to 13 years old. After school and in vacation their business is to find and practice ways to nag older people and run behind stray dogs and cats. Now they also do Foldscoping. In this summer, I conducted a few Foldscope sessions. We collected diverse samples and learned about them. Whenever I see the kids first time introduced with foldscope, I imagine of the Antonie van Leeuwenhoek- the first Microscopist and father of Microbiology. Initially, even he might have fascinated by microscope and might have explored the surroundings in the natural form without the use of stains. While observing samples we started from Introduction and need of microscope, basic principle behind microscopy, function of an eye, and single cell as a basic unit of life. We also learned how cells are diverse in their size and shape not only at a microscopic level but also at a macroscopic level. I explained how this microscopic diversity is responsible for creating the diverse microscopic and macroscopic world. Lastly, we saw organ system how all these cells work together in a team like any organization and how all things are connected and interdependent on every element on this earth; this lead to a small conversation on value-based education. really love this tool because it is an immediate experiential tool.
Most of the samples were observed under natural light and kids also feel comfortable as they don't feel that they are lacking something as classroom kits don't have light modules.
All sessions were spontaneous. Children's questions lead the sessions and gave structure to it.

Sonali Kadam/Kunal Kanase

## अंधारातील दिवे |लिज्जत पापड

लिज्जत पापड म्हणजेच श्री महिला गृह उद्योग हि भारतातील सगळ्यात जुन्या सहकारी संस्थांपैकी एक आहे. लिज्जत पापड पापड,गव्हाचे पीठ, चपाती , डिटर्जंट पावडर , साबण इत्यादी वस्तूंचे उत्पादन करतात. ७ महिलांनी एकत्र येऊन सुरु केलेला हा उपक्रम आज ४३००० महिलांना रोजगार देतो आणि त्याच्या ८१ शाखा आहेत.

*या न्यूजलेटर मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेली साहित्य,मते हि त्यांच्या निर्माणकर्त्यांची आहेत.त्यांच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

# MPSC परीक्षेचे स्वरूप




MPSC म्हणजे MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION राज्य लोकसेवा आयोगमार्फत राज्यातील विविध विभागातील Class 1, 2 आणि class 3 श्रेणीची पदे भरली जातात.
राज्यातील सरकारी Engineers, Doctors तसेच Govt. कॉलेज मधील professors सुद्धा MPSC च्या वेगवेगळ्या परीक्षेतून निवडले जातात.
राज्यातील प्रशासन सांभाळण्यासाठी जे महत्वाचे अधिकारी उदा.उपजिल्हाधिकारी (Dy.collector) , तहसीलदार , उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस उपाधीक्षक ( Dy.SP) असतात त्यांची निवड ही MPSC च्या राज्यसेवा स्पर्धा परीक्षेतून होते. आणि PSI, STI, ASO म्हणजेच पोलीस उपनिरीक्षक ही class 2 ची पदे दुय्यम सेवा ( Combine) परीक्षे मार्फत भरली जातात.

MPSC राज्यसेवा परीक्षा 3 टप्यात घेतली जाते.

- पहिला टप्पा — पूर्व परीक्षा Prelims(400 marks)
- दुसरा टप्पा — मुख्य परीक्षा mains (800 marks)
- तिसरा टप्पा – Interveiw (100 marks)

यातील मुख्य परीक्षेचे आणि मुलाखतीचे गुण अंतिम यादीसाठी विचारात घेतले जातात. पूर्व परीक्षेचे गुण अंतिम यादीत ग्राह्य नसतात फक्त मुख्य परीक्षेला पात्र होण्यासाठी पूर्व परीक्षेचे महत्व आहे.

## MPSC परीक्षेच्या पात्रता

- वय वर्ष 21 पूर्ण असावे.
- पदवी चे शिक्षण पूर्ण झालेले असावे, म्हणेज तुम्ही Graduate असले पाहिजे. पदवीच्या तिसऱ्या वर्षाला असलेले विध्यार्थी सुद्धा मुख्य परीक्षा देऊ शकतात. परंतु त्यांच्या final निकाल मुख्य परीक्षेच्या आधी जाहीर झालेला असावा लागतो.
- कोणत्याही क्षेत्रातीलपदवी असली तरी चालते.( सरकार मान्य विदयापीठाची ) सरकार मान्य मुक्त विदयापिठाची पदवी सुद्धा ग्राह्य आहे. (मुक्त विदयापिठाला आणि त्या पदवीच्या कोर्स ला UGC ची मान्यता असणे गरजेचे आहे. बाजारात बऱ्याच संस्था एका वर्षात UGC मान्य डिग्री देतात पण ही अशी डिग्री MPSC ला चालत नाही, पुढे verification च्या वेळी तुम्ही अडचणीत येऊ शकता अशा डिग्री घेऊ नयेत.)
- वयोमर्यादा :
  1) उमेदवार कमीत कमी 19 वर्ष पूर्ण असलेला असावा .
  2) आणि जास्तीत जास्त वयोमर्यादा खालील प्रमाणे:
  OPEN – 38 years
  OBC – 43years
  ph candidate – 45 years.

## अभ्यासासाठी चे नियोजन

| दिवस | मुख्य अभ्यास विषय रोज ४ तास | दुसरा विषय रोज २ तास | तिसरा विषय रोज २ तास |
|---|---|---|---|
| पहिले ४५ दिवस | सर्व सामान्य विज्ञान- PHYSICS CHEMISTRY BIOLOGY | प्राचीन आणि मध्ययुगीन इतिहास | — |
| पुढचे ३० दिवस | राज्यशास्त्र , POLITY | SCIENCE REVISION | आधुनिक भारताचा इतिहास |
| पुढे ३० दिवस | अर्थशास्त्र,ECONOMICS | POLITY REVISION | आधुनिक भारताचा इतिहास |
| पुढे ३० दिवस | सर्व भूगोल,जग,भारत,महाराष्ट्र | ECONOMICS REVISION | HISTORY REVISION |
| 15 दिवस | पर्यावरण आणि चालू घडामोडी | GEOGRAPHY REVISION | GEOGRAPHY REVISION |

TOTAL: 150 दिवसामध्ये सर्व विषयांचा अभ्यास होऊन एक एक REVISION पण झालेलं असेल आता जो दुसरा पेपर आहे CSAT त्यासाठी आणि चालू घडामोडी साठी वेगळा वेळ द्यावा लागेल.

मित्रांनो एक गोष्ट लक्षात ठेवा वरती जो वेळ तुम्हाला मी सांगितला आहे तेवढा वेळ या विषयांचा अभ्यास करायला लागतो म्हणजे लागतोच . कितीही हुशार विद्यार्थी असला तरीही त्याला या विषयांसाठी एवढा वेळ लागणारच आहे . तुम्ही खूप हुशार असला म्हणून तुम्ही भूगोल १५ दिवसात संपवू शकत नाही . जर तुमचा पदवीचा तो विषय असेल तरी सुद्धा १५ दिवसात हा विषय संपणार नाही .आपले लक्ष्य समोर स्पष्ट ठेवा . आणि त्यानुसार अभ्यास करा . हा अभ्यास एका वर्षात पूर्ण करता आला नाही म्हणून विद्यार्थी पहिल्या वर्षात पास होत नाहीत . आणि जे लोक हा अभ्यास ५ वर्ष

*या न्यूज़लेटर मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेली साहित्य,मते हि त्यांच्या निर्माणकर्त्यांची आहेत.त्यांच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

झाले तरी पूर्ण करत नाहीत ते वर्षानुवर्षे या परीक्षांमध्ये काढतात आणि आपला पैसा , अमूल्य वेळ आणि तरुणपणाची महत्वाची वर्षे वाया घालवतात . येणाऱ्या नवीन विद्यार्थ्याला या दलदली पासून वाचवावे म्हणून हा आमचा एक प्रयत्न . शेवटी निर्णय तुमचा आहे कि किती वर्षे तुम्हाला यात वाया घालवायची आहेत आणि किती लवकर यशस्वी व्हायचे आहे .

प्रत्येक विषयासाठी नेमक काय वाचायचं ? कुठून वाचायचं ? कस वाचायचं ? याचे सगळे सविस्तर विवेचन पुढे दिलेले आहे . म्हणजे जर तुम्हाला STATE BOARD वाचायचेत तर त्यात कोणत्या विषयाचे कोणते धडे वाचायचे एवढ्या खोलवर माहिती इथे दिलेली आहे ती निट वाचा आणि त्यानुसार आपली अभ्यासाची सुरुवात करा .

विषय : SCIENCE सामान्य विज्ञान आणि इतिहास

- वेळ : ४५ दिवस
- वेळेचे विभाजन : रोज ४ तास विज्ञान विषयासाठी
- रोज २ तास इतिहास विषयासाठी

काय वाचायचे ? कसे वाचायचे ? नेमका अभ्यास काय करायचा ?
१५ दिवस भौतिकशास्त्र : रोज ४ तास एकूण ६० तास

- सुरवात STATE BOARD च्या पुस्तकांपासून करायची आहे .
- ७० टक्के प्रश्न हे यातून येतात त्यामुळे 10 वी पर्यंत ची विज्ञान ची पुस्तके खूप महत्वाची आहेत .
- यासोबतच जर तुम्हाला NCERT ची पुस्तके वाचायली जमली तर नक्की वाचा त्यांचा पण फायदा होतोच .

STATE BOARD मध्ये कोणते कोणते धडे वाचायचे?

- ७ वी विज्ञान – धडा क्रमांक : ६ , ७ , ८ , ९ , १३ , १४ , १५ ,१६ , १७ , १८ , १९ , २० .
- ८ वी विज्ञान – ३ , ४ , १४ , १५ , १६ , १७
- ९ वी विज्ञान – १ , २ , ३ , ११ , १२
- 10 वी विज्ञान भाग १ – १ , ४ , ५ , ६ ,७ .

NCERT मध्ये कोणते धडे वाचावे?

- 6th all science book
- 7th topic numbers – 4 , 6 , 13 , 14 , 15 .
- 8th Ncert – 11, 12, 13, 16, 17
- 9th Ncert – 8, 9, 10, 11, 12 .
- 10th Ncert — 10, 11, 12, 13 , 14 .
- 11th Ncert – part one – 1 to 8th
- Part two – 14, 15

सामान्य विद्यान मधील इतर २ भागांचे अभ्यास साहित्य वितरण

| | Biology / जीवशास्त्र | Chemistry / रसायनशास्त्र |
|---|---|---|
| ६ वी | १ ते ८ धडे | – |
| ७ वी | १ ते ५ आणि 10 ते १२ | — |
| ८ वी | १ , २ , १० , ११ , १९ | ५ , ६ ,७ , १२ ,१३ |
| ९ वी | ६, ८ ,१५ , १६ | ४, ५ , १३ , १४ |
| 10 वी भाग १ | – | २, ३ ,८ , ९ |
| 10 वी भाग २ | १ ते ९ धडे | – |

(संदर्भ आणि साभार : DIAC)

## RUBAIYAT

- *Faith is the bird that feels the light when the dawn is still dark.*
- *You can't cross the sea merely by standing and staring at the water.*
- *Death is not extinguishing the light; it is only putting out the lamp because the dawn has come.*
- *Let your life lightly dance on the edges of Time like dew on the tip of a leaf.*
- *The butterfly counts not months but moments, and has time enough.*
- *A mind all logic is like a knife all blade. It makes the hand bleed that uses it.*
- *I slept and dreamt that life was joy. I awoke and saw that life was service. I acted and behold, service was joy.*

*-Rabindranath Tagore*

*या न्यूज़लेटर मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेली साहित्य,मते हि त्यांच्या निर्माणकर्त्यांची आहेत.त्यांच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

## READ AND REHEARSE

आज शाम से मैंने अपनी छत पर गुलेल और कुछ कंकर इकट्ठा कर रख लिए थे। कल सुबह सूरज निकलने के पहले वह फूल तोड़ने आएगा तो उसके सिर पर गुलेल से वार करूंगा। 'साला फूल चोर' रोज मेरे बगीचे को उजाड़ जाता है, मैं बुदबुदाया। इतना ही पूजा में फूल चढ़ाने का शौक है तो अपने घर पर मेहनत कर क्यों नहीं पौधे लगाता। दूसरों की मेहनत पर ऐश करने वाले को सजा तो मैं खुद ही दूंगा।

वह हमारे घर से ज्यादा दूर नहीं रहता है, पर मैं उसे व्यक्तिगत रूप से जानता नहीं हूं। अड़ोस पड़ोस से मालूम हुआ कि वह मार्निंग वाक के बहाने मोहल्ले में घूम-घूम कर फूल चुराता है और इसके लिए उसने तार की आंकोड़ा वाली सींक भी बनाई है, जिससे दूरी पर लगे फूल सींक में फंसा कर तोड़ सके। कल तो उसने हद ही कर दी। हमारे घर पर लगे सुंदर-सुंदर गुलाब तोड़ लिए, सींक से फूल खींचने के कारण गमला नीचे गिरकर टूट गया।

इस बात का जिक्र जब मैंने अपने पड़ोसियों से किया तब पता चला कौन यह हरकत करता है। हमारे मित्र की पत्नी ने तो मुझे उसका नाम और पता देते हुए यह भी बताया कि 'भाई साहब मैं तो एक दिन उसे चप्पल से पीटने उसके पीछे भागी थी पर वह तो हाथ ही नहीं आया।' मैं छत पर छिप कर उसके आने का इंतजार कर रहा था और मन ही मन सोच रहा था आने दो उसको आज उसका हिसाब बराबर जरूर कर दूंगा। यह कौन-सा तरीका है कि, दूसरे के घरों से फूल चुराकर उससे भगवान की पूजा करो। इससे अच्छा होता कि किसी माली की बंदी लगवा लेता। पर आजकल सबको फ्री में मजा करने की आदत जो है।

लगभग 1 से ढेढ़ घंटे मैं छत पर टहलता रहा। उसकी प्रतीक्षा करता रहा। फिर घर के अंदर से पत्नी ने आवाज दी, कब तक छत पर टहलते रहोगे और कोई काम नहीं है क्या, चाय तैयार है। मैं अपनी योजना को नाकाम होते देख बेमन से नीचे घर में आ गया।

पर वह आज आया क्यों नहीं? आता तो जरूर उसे मजा चखाता। यह सोचते-सोचते कब चाय खत्म कर ली समझ में ही नहीं आया। मैंने पत्नी से कहा सुनती हो मैं जरा घूम कर आता हूं, आज चाय में मजा नहीं आया। मेरे वापस आने पर फिर से अदरक की जरा कड़क चाय बनाना।

यह कह कर मैं घर से बाहर निकला और सीधा उसके घर की ओर जाने के लिए मुड़ा। रास्ते में पुन: भाभीजी मिल गई। नमस्कार के बाद उन्होंने पूछा 'आज तो फूल सही सलामत होंगे साहब?' मुझे लगा भाभीजी ने देख लिया होगा मुझे छत से बगीचे की निगरानी करते हुए। सो मैंने कहा आज वह फूल तोड़ने आता तो जरूर मार खाता 'साला फूल चोर'।

भाभीजी ने थोड़ा सीरियस होकर बताया 'भाई साहब वह अब नहीं आएगा, सुबह-सुबह फूलों के साथ वह भगवान के पास पहुंच गया।' मैं स्तब्ध रह गया सुन कर, अगले ही पल सब बदला-बदला नजर आने लगा। मन एकदम दुखी हो गया उसकी मृत्यु की खबर सुनकर। कुछ भी हो मौत एक शाश्वत सत्य है, जिसके सामने सब झूठ है, मृत्यु सारे गिले-शिकवे, द्वेष मिटा देती है और हर कोई मृत आत्मा की शांति की कामना करता है।

मैंने तुरंत घर जाना ही उचित समझा। घर आकर मैंने अपने गमलों पर नजर डाली। तरोताजा गुलाब के फूल रोज की तरह सूरज की लालिमा के साथ खिले हुए बहुत खुबसूरत दिखाई दे रहे थे पर फूलों में सुबह की मुस्कुराहट का भाव दिखाई नहीं दे रहा था, क्योंकि उन्हें भी आभास हो गया था कि अब कोई उन्हें तोड़कर भगवान के मस्तक पर नहीं चढ़ाएगा और इस वजह से उन्हें इठलाने का भी मौका नहीं मिलेगा।

- दिलीप गोविलकर

## UNMUTE THE MUTE

